महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चासाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-०६२६ /प्र.क्र.१३४/१८-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २३.०७.२०२६

वाचा:- १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग समक्रमांक शासन निर्णय दि. २०.०७.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७/०४/२०२५ व दिनांक २९.०४.२०२५.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९/०४/२०२६.

प्रस्तावना :-

भारत टॅक्सी' (Bharat Taxi) हा सहकार मंत्रालयाद्वारे 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ' (NCDC) आणि सात प्रमुख राष्ट्रीय सहकारी संस्थांच्या सहकार्याने राबविला जाणारा, सहकारावर आधारित आणि नाविन्यपूर्ण गतिशील (mobility) उपक्रम आहे. 'भारत टॅक्सी' मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे कार, ऑटो-रिक्षा आणि बाईक टॅक्सी सेवा पुरवते, जे प्रवाशांना थेट चालकांशी जोडते. महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्घाटन कार्यक्रम मा. मुख्यमंत्री आणि मा. केंद्रीय सहकार राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि. २३.०७.२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. सदर नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चास अंदाजे रु. २५.०० लाख (अक्षरी - रु. पंचवीस लाख फक्त) ला शासन निर्णय दि. २०.०७.२०२६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त मान्यतेस अनुसरुन या कार्यक्रमासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्घाटन कार्यक्रम मा. मुख्यमंत्री आणि मा. केंद्रीय सहकार राज्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि. २३.०७.२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. सदर नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उद्भवणाऱ्या खर्चास अंदाजे रक्कम रु. २५.०० लाख (अक्षरी-रु. पंचवीस लाख फक्त) ला शासन निर्णय दि. २०.०७.२०२६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात दि. २३.०७.२०२६ रोजी महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' चा औपचारिक उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मुख्य लेखाशिर्ष २४२५ २५९८, २६ जाहिरात प्रसिध्दी या उद्दिष्टांतर्गत रु.२५.०० लाख (अक्षरी-रु. पंचवीस लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९/०४/२०२६ मधील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करताना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाच्या प्रचलित नियम व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करावा तसेच सदर रकमेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व त्याची प्रत शासनास सादर करावी.

५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वित्त विभागाच्या उपरोक्त वाचा क्र. २ व ३ येथील शासन परिपत्रकामधील सूचनांचे पालन करावे.

६. सदर खर्च विभागाच्या १०५, माहिती व प्रसिध्दी, (०१) माहिती व प्रसिध्दी (०१)(०१) सहकार विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची जाहिरात व प्रसिध्दी (कार्यक्रम) २६, जाहिरात प्रसिध्दी (२४२५ २५९८) या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधुन भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४७७/२०२६/व्यय-२, दिनांक २२.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७२३१९०००८८२४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c329798028660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2026.07.23 19:01:18 +05'30'

(तेजल र. पारडे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई.
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. अपर निबंधक तथा सह सचिव (कार्या. १८स) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव(अर्थसंकल्प) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती, कार्या-१८स.